**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक ११ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **'महाराष्ट्र राज्य देशाचे पॉवर हाऊस असून देशाला नवीन उंचीवर नेण्यासाठी भक्कम योगदान देत असल्याचं' उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं - महाराष्ट्र विधान परिषद शतक महोत्सवी कार्यक्रमात प्रतिपादन.**
2. **देशाला २०२५ सालापर्यंत क्षयमुक्त करण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व व्यक्तींना क्षयरोगाची लस देण्याची मोहीम राज्यात राबविणार - सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची विधानसभेत माहिती.**
3. **भ्रष्टाचारामुळे वर्षभरात समृद्धी महामार्गाला भेगा पडल्याची नाना पटोले यांची टीका तर राज्यातल्या आत्महत्या थांबवण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करण्याची विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची मागणी.**
4. **१६ लाखांचे बक्षीस असलेल्या दोन नक्षली महिलांचं आज पोलिसांपुढे आत्मसमर्पण.**

****

उपराष्ट्रपती

महाराष्ट्र राज्य देशाचे 'पावर हाऊस' असून देशाला नवीन उंचीवर नेण्यासाठी भक्कम योगदान देत असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. मुंबई इथं विधानभवनात विधान परिषदेच्या शतक महोत्सवी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत आहे . 'देखो मुल्क मराठों का' या गीताचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला आणि राज्याच्या धरतीला आपण नमन करत असल्याचे ते म्हणाले. सध्या ते सदनाला संबोधित करत आहे. तत्पूर्वी, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उप्राष्ट्रपती जगदीप धनखड यांचं स्वागत केलं.यावेळी राज्यपाल रमेश बैस, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोर्हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सर्व सदस्यांची उपस्थिती आहे. हा दिवस

सर्वांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. अनेक राज्यांच्या विधिमंडळात उपराष्ट्रपतींनी मार्गदर्शन केलं आहे. महाराष्ट्राला नवीन उंचीवर नेण्यासाठी याचा लाभ होईल असं शिंदे म्हणाले. नागपूरच्या विधानभवनात विधान परिषदेच्या शतक महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती त्यांनी यावेळी आवर्जून दिली. तर राज्यपालांनी संतांची भूमी असलेल्या या राज्याला नमन करून शतक महोत्सवी कार्यक्रमाच्या सर्व सदस्यांना शुभेच्छा दिल्या. हे विधिमंडळ विकासात्मक चर्चेसाठी आणि जनहिताच्या मुद्द्यांवर केलेल्या उहापोहासाठी ओळखले जाते असे ते म्हणाले.

विधानसभा प्रश्नोत्तरे

२०२५ पर्यंत क्षयमुक्त भारत करण्याच्या प्रयत्नात राज्यात १८ वर्षांवरील सर्व व्यक्तींना क्षयरोगाची लस देण्याची मोहीम राबवण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्री तानाजी सावंत यांनी आज विधानसभेत ही माहिती दिली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. आरोग्य संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल आणि दाट लोकसंख्येच्या ठिकाणी या रोगाचं प्रमाण असल्यामुळे ही समिती मुंबईत विशेष अभ्यास करून आपला अहवाल देईल अशी माहितीही सावंत यांनी दिली. राज्यातल्या अंगणवाड्या उभारणी तसंच दुरुस्ती यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव करण्यात येईल अशी माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज सदनात दिली. राज्यातील सर्व अंगणवाड्या स्मार्ट करण्यासाठी प्रयत्न सुरू असून वित्त आयोग, जिल्हा परिषदेचा निधी तसंच जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून दुरुस्ती, नवीन बांधकामं केली जात आहेत अशी माहिती मंत्री तटकरे यांनी यावेळी दिली. तर ऑटोरिक्षा, टेम्पो आदी वाहनांच्या परवाना नूतनीकरणासाठी विलंब झाल्यास त्यासाठी पन्नास रुपये प्रति दिन विलंब शुल्क म्हणून दंड आकारण्यात येत होता त्याला स्थगिती देण्यात येत

असल्याची माहिती प्रभारी मंत्री दादा भुसे यांनी एका निवेदनाद्वारे सभागृहात दिली.

विजय वडेट्टीवार-विधानसभा

केंद्र आणि राज्य सरकारच्या नो गॅरंटी कारभारामुळे राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. निसर्गाची अवकृपा आणि सरकारकडून होणारी फसवणूक यामुळे शेतकरी पिळवटून निघाला आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येत वाढ होत आहे. देशातील एकूण आत्महत्येपैकी 30 टक्के आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती देऊन त्यांचे थकित वीज बील माफ करावे, अशी मागणी विधासभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. निर्यात बंदी, हमीभाव नाही, वाढता कर्जाचा बोजा, पिकविमा कंपन्यांकडून होणारी फसवणूक, खते, बियाणे, शेती अवजारे यांचे वाढलेले दर, आणि महागाईने गाठलेला उच्चांक यामुळे सरकारच्या सहा हजार रूपये मदतीचा उपयोग होत नाही, अशी टीका वडेट्टीवारांनी केली.

अबू आझमी/आरक्षण-विधानसभा

राज्य सरकारने मुस्लिमांना आरक्षण द्यावं , अशी मागणी आमदार अबू आझमी यांनी आज विधानसभेत केली. मराठा आणि ओबीसी आरक्षणाची चर्चा होते, पण मुस्लिम आरक्षणाची चर्चा होत नाही. यापूर्वी न्यायालयाने ५ टक्के आरक्षण द्यावे अशी सूचना केली होती पण अजून ते आरक्षण दिलं गेलं नाही असा दावा आझमी यांनी केला. त्यावर संविधानात धर्मावर आधारित आरक्षणाची तरतूद नसून राज्यात मुस्लिमांमधल्या मागास जातींना आरक्षण दिलं गेलं आहे, असं मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले. यानंतर विदर्भातील कोळी समाजाला आरक्षण द्यावं. धनगरांना अनुसूचित जातींमध्ये आरक्षण द्यावं अशी मागणी आमदार यशोमती ठाकूर यांनी केली.

विधानपरिषद लक्षवेधी-फडणवीस

मुंबईच्या इंदू मिल परिसरात डॉ. आंबेडकरांचं स्मारक उभारण्याचं काम वेगाने सुरू आहे. त्यांचा भव्य पुतळा उभारण्यास लागणारा वेळ सोडता उर्वरित काम पुढच्या वर्षी पूर्ण होईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिलं. परळमधल्या बी. आय. टी. चाळीत डॉ. आंबेडकरांचं स्मारक उभारण्याबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने ते बोलत होते. या स्मारकाचा आराखडा तयार करण्याची सूचना महापालिकेला देण्यात आली आहे, त्या चाळीत अद्याप काही लोक राहत असून त्यांचं पुनर्वसन झाल्यावर स्मारकाचं काम पुढे नेण्यात येईल, असंही त्यांनी नमूद केलं. राज्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत या वर्षीच्या मे महिन्यापर्यंत ६,५२९ कारवाया करण्यात आल्या असून यात ४,१३१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली. राज्यात अंमली पदार्थांचं जाळं रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अंमली पदार्थविरोधी समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यांच्या नियमित बैठकांचे अहवाल केंद्र आणि राज्य सरकारला पाठवणं अनिवार्य करण्यात आलं आहे. त्या अनुषंगाने केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध तपास यंत्रणांमध्ये समन्वय साधून काम सुरू आहे, असं फडणवीस म्हणाले. दरम्यान महाराष्ट्र खासगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक २०२४ विधानपरिषदेत आज एकमताने मंजूर करण्यात आलं.

नाना पटोले

५५ हजार कोटी रुपये खर्च करुन बांधलेल्या मुंबई नागपूर समृध्दी महामार्गाच्या बांधकामात झालेल्या भ्रष्टाचारामुळे या महामार्गाला वर्षभरातच भेगा पडल्या आहेत. एकीकडे मृत्यूचा महामार्ग अशी प्रतिमा निर्माण झालेल्या समृद्धी महामार्गातून फक्त सत्ताधाऱ्यांचीच समृद्धी झाली आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना

पटोले यांनी केली. विधिमंडळ परिसरात पटोले प्रसार माध्यमांशी बोलत होते. १८ हजार कोटी रुपयांच्या अटल सेतूलाही भेगा पडल्याच आम्ही उघड केलं होतं. ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यावर विरोधी पक्ष सरकारला उघडे पडणार होता म्हणून गोंधळात पुरवणी मागण्या मान्य करून सरकारने लोकशाहीचा खून केला आहे अशी टीकाही पटोले यांनी केली.

जागतिक लोकसंख्या दिवस

आज जागतिक लोकसंख्या दिवस आहे. जगभरात वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे येणारी आव्हानं आणि संधी याकडे लक्ष केंद्रीत करण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाअंतर्गत १९८९ पासून दरवर्षी ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिवस म्हणून पाळला जातो.

नक्षल आत्म समर्पण

१६ लाख रुपयांचे ईनाम असलेल्या दोन जहाल नक्षली महिलांनी आज पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. प्रमिला सुखराम बोगा उर्फ मंजुबाई वय ३६ आणि अखिला संकेर पुडो उर्फ रत्नमाला उर्फ आरती वय ३४ अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलींची नावे आहेत. प्रमिला सुखराम बोगा हिच्यावर ४० गुन्हे दाखल आहेत. शासनाने तिच्यावर ८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तर अखिला पुडो हिच्यावर देखील ७ गुन्हे दाखल सून, शासनाने ८ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. २०२२ पासून आतापर्यंत २१ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, नक्षल्यांनी हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण करुन स्वाभिमानाचे जीवन जगावे, असं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

नवेगाव नागझिरा

भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारी करिता आलेल्या पर्यटकांच्या संख्येत यंदा लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षी एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांमध्ये या व्याघ्र प्रकल्पाला 15 हजार पर्यटकांनी भेट दिली होती. यावर्षी हे प्रमाण २० टक्क्यांनी वाढलं असून तब्बल 17 हजार 332 पर्यटकांनी इथं जंगल सफारी केली आहे. त्यातून 42 लाख 17 हजार रुपये एवढा महसूल नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला मिळाला आहे. नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सहज होणारे वाघाचे दर्शन हे पर्यटकांच्या वाढीचं मुख्य कारण मानलं जात आहे.

हवामान

भंडारा जिल्ह्यात अखेर दमदार पावसाने हजेरी लावली आहे. जिल्ह्यात पाऊस पडत नसल्यामुळे धान रोवन्या खोळंबल्या होत्या. सर्वत्र पावसाने हजेरी लावली असल्याने शेतकरी सुखावला असुन धान रोवणीला वेग येणार आहे.

****